# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९०१ /२०२५ दि. १६ /०५/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १८/०५/२०२५ रोजी दुपारी १६:०० वाजेनंतर ग्रिन चौक, मानपाडा रोड, डोंबिवली पुर्व, शिवसेना मध्यवर्ती शाखेच्या समोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मेघडंबरी पुतळयाचा अनावरण कार्यक्रम पार पडणार आहे. सदर कार्यक्रमास मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मा. खासदार, मा. आमदार तसेच नागरीक, युवक, युवती मोठया संख्येने उपस्थीत राहणार आहेत. सदर कार्यक्रमाकरीता विविध मंडळ, संस्था सहभागी होणर आहेत. सदर मिरवणुकीमुळे डोबिंवली पुर्व या भागात वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ग्रिन चौक, मानपाडा रोड, डोंबिवली पुर्व येथुन इंद्रा चौक, डोंबिवली पुर्वच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ग्रिन चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व वाहने ग्रिन चौक, मानपाडा रोड येथुन चिपळुणकर पथ या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) इंद्रा चौक येथुन मानपाडा रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **इंद्रा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डावे वळण घेवुन भगतसिंग रोडने इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १८/०५/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,</u>**
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.

CamScanner